# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/05/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

१) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत मौजा चंदन पार्डी येथे दिनांक ३०/०४/२०२३ चे १८/३० वा. ते १९/१५ वा. दरम्यान यातील नमुद आरोपी नामे– रोशन विठठलराव गायकवाड, वय ३७ वर्ष, रा. चंदनपारडी हा आपल्या हातात गंजलेली लोखंडी तलवार घेवुन फिरत होता. सदर इसम हा कोणताही दखलपात्र गुन्हा करण्याच्या उददेशाने गंजलेली लोखंडी तलवार आपल्या हातात घेवुन फिरत असल्याने सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– सफौ भोजराज तांदुळकर ब. नं. ५०६ पोस्टे कोंढाळी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ४, २५ आर्म ॲक्ट कायदाअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ भोजराज तांदुळकर ब. नं. ५०६ हे करीत आहेत.

२) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा ब्राम्हणी फाटा समोरील केटीएम हॉलजवळ दिनांक ३०/०४/२०२३ चे २०.०० वा. दरम्यान यातील नमुद **आरोपी नामे– सुरेन्द्र बापुदारस निमावत, वय ३१ वर्ष, रा. वार्ड क्र. १ घोराड** हा आपले जवळ लोखंडी एका बाजुने धारदार पाते असलेली एका बाजुने चापट असलेली ज्याची मुठी पासुन ते टोकापर्यतची लांबी २० इंच टोकापासुन मुठी पर्यत लांबी १५ इंच लांब मुठ ५ इंच व ज्याची मुठची गोलाई ४ इंच लांब मध्यभागी चापट पात्याची रूंदी ३ सेमी असलेली अशा प्रकारची जुने धारदार पाती किंमती अंदाजे ३००/– रू हा ब्राम्हणी फाटयासमोरील केटीएम कंपनी जवळ कळमेश्वर येथे बडबड करीत हातामध्ये लोखंडी हत्यार घेवुन भिरकावीत फिरत असतांना मिळुन आल्याने सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– पोशी ७६२ राणासिंह ठाकुर पोस्टे कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४, २५ आर्म ॲक्ट कायदाअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पिएसआय पाली मो. क्र. ९०११०३८६७७ हे करीत आहेत.

**३) पो.स्टे. बेला** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा बेला टाउन दिनांक ३०/०४/२०२३ चे १२:३० ते १३:०० वाजता दरम्यान यातील **आरोपी नामे— त्रृतुकेश भारद हींगणीकर, वय २२ वर्षे, रा. बेला ता. उमरेड जि. नागपुर** हा पोत्यात एक जुनी लोखंडी लांब पात्याची तलवार बेकायदेशीर बाळगुन मिळुन आला त्यास ताब्यात घेऊन गुन्हा नोंद करून तपासात घेतला. जप्त मुद्देमालाचे वर्णन — एकुण लांबी २७ सेंटीमिटर व तिची लाकडी मुठ असुन तीची लांबी व व्यास ५ सेंटीमिटर असुन पाता २२ सेंटीमिटर लांब कीमंती १०० रू. आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोना सुरेंद्र ठाकरे ब. नं. २०२७ पो.स्टे बेला यांचे रीपोर्टवरून पोस्टे बेला येथे आरोपीविरुध्द कलम ४, २५ आर्म ॲक्ट १९५९ कायदाअन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सुरेंद्र ठाकरे ब. नं. २०२७ पो.स्टे बेला ९२९४८६५३६६ हे करीत आहेत.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**